तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी — २२६२०६०१,२२६९०६०२,२२६४११५०,२२६४११५१ फॅक्स -२२६९ २१०२/२२६९००७.
E-mail : desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

सूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/४९
दिनांक : १६ जानेवारी,२०१७

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश CET मार्फत करण्याबाबत...

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील राज्यातील अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी MHT-CET ही सामायिक प्रवेश परीक्षा राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेवतीने " नोडल अधिकारी " म्हणून **संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेमार्फत दिनांक ११ मे, २०१७** रोजी घेण्यात येणार आहे.

दिनांक २८ ऑगस्ट २०१५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी MHT-CET ही प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य आहे. शासनाने दिनांक ३.१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार MHT-CET २०१७ सामायिक प्रवेश परीक्षा ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १२ वी च्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. या प्रवेश परीक्षेकरिता तीन प्रश्नपत्रिका असतील. भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयाची प्रत्येकी ५० गुण असलेली सामायिक प्रश्नपत्रिका असेल तथापि गणित १०० गुण व जीवशास्त्र १०० गुण असलेल्या स्वतंत्र प्रश्नपत्रिका असतील. अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता MHT-CET २०१७ या प्रवेश परीक्षेचा एकच अर्ज विद्यार्थ्यांना भरावा लागेल.

अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठीची गुणवत्ता यादी सामायिक प्रवेश परीक्षेतील भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र व गणित या तीन विषयांच्या गुणांवर तयार करण्यात येईल.

औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठीची गुणवत्ता यादी सामायिक प्रवेश परीक्षेतील भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र व गणित/जीवशास्त्र या तीन विषयांच्या गुणांवर तयार करण्यात येईल.

दिनांक ११ मे २०१७ रोजी आयोजित करण्यात येणा-या MHT-CET २०१७ साठी अर्ज करण्याच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये जाहीर करण्यात येणार आहे. सर्व संबंधितांनी या अधिसूचनेची नोंद घ्यावी. तसेच सर्व महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, वरील माहिती त्यांच्या महाविद्यालयांतील मार्च २०१७ मध्ये इयत्ता १२ वी ची परीक्षा देणा-या किंवा शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये राज्यातील अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांस प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

सही/-
(डॉ.सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्र.क्र.:- विकाअ/शिक्षण/MTCET/२०१७/226
सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
दिनांक :- 24 JAN 2017

प्रत :- सूचनाफलक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती येथे लावण्याकरिता।

D:\Budage\२०१७-१८\Engg\२०१७-१८ admission Through CET.docx

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

[illegible]